दैनिक


# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

बुलडाणा, रविवार, दि.१५ जून २०२५

वर्ष : ०४, अंक : ३०४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com




## मुंबईत तुफान पाऊस; मुसळधार ते अतिमुसळधार...

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१४, मुंबई :** महाराष्ट्रात पुन्हा एकदा मुसळधार ते अतिमुसळधार पावसाला सुरुवात होताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात दडी मारुन बसलेल्या पावसाने आज संध्याकाळी पुन्हा एकदा एन्ट्री मारली. सर्वात आधी ठाणे जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाला सुरुवात झाली.



पावसाने शनिवारी संध्याकाळी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ शहरांना चांगलंच झोडपून काढलं. मुसळधार पावसामुळे कल्याण डोंबिवलीत सखल भागांमध्ये पाणी साचल्याची माहिती समोर आली. यानंतर ठाणे शहरात मुसळधार पाऊस सुरु झाला. हाच पाऊस पाहतापाहता मुंबईत येऊन धडकला.

मुंबईत ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडतोय. चाकरमान्यांचा ऐन घरी जाण्याच्या वेळी पाऊस पडत असल्यामुळे त्यांची मोठी ससेहोलपट होत आहे. अनेकांची तारांबळ उडत आहे. मुसळधार पावसामुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाल्याची कोणतीही बातमी सध्या तरी समोर आलेली नाही. पण पाऊस असाच कोसळत राहिला तर रेल्वे वाहतुकीवर परिणाम पडण्याची भीती आहे. राज्यातील काही जिल्ह्यांना उद्या पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**हवामान विभागाकडून 'या' जिल्ह्यांना अलर्ट**

हवामान विभागाकडून रत्नागिरी जिल्ह्याला उद्या रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पालघर, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण विदर्भात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सध्या रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा धुमाकूळ सुरु आहे.

**कल्याण डोंबिवलीत मुसळधार पाऊस...**

कल्याण डोंबिवली परिसरात ढगाळ वातावरण होतं. यानंतर सायंकाळी सात नंतर कल्याण आणि डोंबिवली परिसरात रिमझिम पावसाला सुरुवात झाली. मात्र मागील अर्ध्या तासापासून पावसाचा जोर वाढल्याने जोरदार पावसानेच शहरातील काही प्रमुख रस्ते जलमय झाले आहेत. कल्याणमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील रस्त्यावर देखील गुडघ्यावर पाणी साचल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. भिवंडी वरून शिळफाटा परिसरात जाणारा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्यावर पाणी साचल्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. महत्वाचे म्हणजे, महापालिकेने केलेल्या नाले सफाईच्या दाव्यांवरच या पावसाने प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मान्सूनपूर्व तयारीत ढिसाळपणा झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

## ज्या विश्वासाने आम्हाला निवडून दिले त्याच विश्वासाने जनतेची कामे करणार - आ. अभिजीत पाटील

**अक्षराज : विकास सरवळे**
**दि.१४, पंढरपूर :** माढा मतदारसंघातील लोकांनी ज्या विश्वासाने आम्हाला निवडून दिले आहे त्याच विश्वासाने जनतेचे प्रत्येक काम करण्यासाठी जबाबदारी आमची असून रस्ते, वाहतूक, पिण्याचे पाणी, आरोग्यविषयक सुविधा, एमआयडीसी माध्यमातून युवकांना रोजगार उपलब्ध, वीज पुरवठा व इतर बाबींसह युवक, महिला, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यमान कसे सुधरेल यासाठी सर्वसामान्य प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे. आलेगाव बुद्रुक तालुका माढा येथे माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील व माढ्याचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत आबा पाटील यांचा ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा व कार्यकर्ता संवाद मेळावा पार पडला.



यावेळी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख,भारत पाटील, रावसाहेब देशमुख, बाळासाहेब ढेकणे, तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, डीव्हीपी बँकेचे चेअरमन औदुंबर महाडिक, उपसरपंच रामचंद्र पवळ, शंकरराव मोहिते पाटील कारखान्याचे संचालक गोविंद पवार, शिवसेनेचे अध्यक्ष मधुकर देशमुख, नानासाहेब ढवळे, सुरेश पाटील, अनिल पाटील, भारत माने, रामकृष्ण काळे, संतोष ढवळे, भाऊसाहेब काळे, पंढरीनाथ चंदनकर, गोरख देशमुख, आबासाहेब वाघ, अरुण गाडे, सतीश केचे, महेंद्र पाटील, दादासाहेब कळसाईत, हरिभाऊ माने ,भारत माने, अनिल महाडिक, रावसाहेब ताठे, सतीश हेगडकर, प्रशांत पाटील, श्रीमंत केचे, लखन काळे, सुलतान शेख, शंकर सुरवसे, सतीश काळे, अशोक केचे, विकी भोसले, प्रताप पिसाळ, हनुमंत शेलार, बाळासाहेब शिरतोडे, दत्तात्रय बंडलकर, अध्यक्ष विनायक पाटील, बंडू चंदनकर, समाधान कवडे, माजी सरपंच समाधान पाटील, अभिजीत कवडे, ज्ञानदेव चंदनकर, रामचंद्र चंदनकर, किरण जाधव, अजय भोसले, बळीराम केचे, आप्पासाहेब यादव, अण्णासाहेब माने, जहागीर शेख, विकी भोसले, दीपक लांडगे, भास्कर गुरगुडे उपस्थित होते.

यावेळी आमदार अभिजीत पाटील म्हणाले की; माढा मतदारसंघातील मायबाप जनतेने मतदान रोपे आशीर्वाद देऊन तीस वर्षाची सत्ता उलथून विकासकामे करणाऱ्याला संधी दिली त्यांच्या या प्रेमातून कधीच उतराई होणार नाही. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने कटिबद्ध असून उजनी धरणाच्या पाण्याची नियोजन, भीमा नदीची आवर्तने, कोंढार भागातील बंधाऱ्याचा प्रश्न, राष्ट्रीय महामार्गावरील भिमानगर येथे उड्डाणपूल आरोग्य विषयक उपचारासाठी निधीसह अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

## नाशिक येथील द्वारका वाहतूक कोंडीवर भुजबळांचा थेट आदेश...





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.१४, विंचूर (नाशिक) :** नाशिक शहरातील मुंबई नाका व द्वारका सर्कल येथे होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी स्पष्ट सूचना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी अधिकाऱ्यांना दिली. यासाठी सिग्नल यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करून पोलीस, महानगरपालिका आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने संयुक्तपणे समन्वय साधावा, असे आदेशही त्यांनी दिले.

मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी मुंबई नाका व द्वारका सर्कल परिसराची पाहणी करून तेथील वाहतुकीची स्थिती प्रत्यक्ष पाहिली. या दौऱ्यात म्हाडा सभापती व शहराध्यक्ष रंजन ठाकरे, पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, महापालिकेचे अभियंता संजय अग्रवाल, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता दिलीप पाटील, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, समाधान जेजुरकर, नाना पवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री भुजबळ म्हणाले, हाजी अली परिसरात यशस्वी ठरलेली सिग्नल यंत्रणा नाशिकमध्येही अंमलात आणावी. सिग्नलवर नियंत्रण राहील आणि वाहतूक विस्कळीत होणार नाही याची काळजी घ्या. नियम तोडणाऱ्यांवर कारवाई करताना इतरांची गैरसोय होणार नाही याची दक्षता बाळगा.

त्यांनी पुढे सांगितले की, सिग्नल चौक, रस्ते आणि आजूबाजूचा परिसर कायमस्वरूपी स्वच्छ ठेवावा. तसेच रस्त्याच्या कडेला वाहने थांबवणाऱ्यांविरुद्धही कठोर कारवाई करावी.

भुजबळांनी अधिकाऱ्यांना उद्देशून खडसावले की, गेल्या वर्षभरात मुंबई नाका आणि द्वारका सर्कल परिसरातील अतिक्रमण, फेरीवाल्यांची गर्दी आणि अस्वच्छतेबाबत अनेकदा सूचना देऊनही कामांमध्ये दिरंगाई दिसत आहे. लहानसहान कामांसाठीही वेळकाढूपणा चालत नाही.

त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, या भागातील अतिक्रमण तात्काळ हटवावे, फेरीवाल्यांचे स्थलांतर करावे आणि परिसरात शिस्त व स्वच्छता राखावी. नाशिक मनपा व पोलीस प्रशासनाने यावर गंभीरतेने कार्यवाही करून ठोस बदल घडवावा.

## थोडक्यात

### सेनापती बापट पतसंस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल
### मुदत संपल्यानंतरही २ वर्षापासून ठेवी परत करण्याकडे टाळाटाळ




**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील शेतकरी आणि विमा एजंट सुभाष अशुजी आग्रे यांनी सेनापती बापट मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या चेरमनसह संचालक मंडळातील सदस्यावर आर्थिक फसवणुकीचा आरोप करत पारनेर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली आहे. आग्रे यांनी त्यांच्या पत्नी शशिकला यांच्या नावे संस्थेत बचत खाते आणि मुदत ठेवींमध्ये सुमारे ३ लाख ५० हजार रुपये गुंतवले होते. याशिवाय, त्यांनी इतर २९ ठेवीदारांच्या २ कोटी ५० लाख ३८ हजार ६१३ रुपयांच्या रकमेचा अपहार झाल्याचा आरोप केला आहे. २०२१ मध्ये त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने अळकुटी शाखेत बचत खाते उघडले होते. त्याचवेळी, त्यांनी दीड लाख रुपये मुदत ठेवी पावत्यांमध्ये गुंतवले होते. संस्थेच्या मॅनेजर किरण शिंदे, चेअरमन रामदास भोसले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास झंझाड यांनी त्यांना जास्त व्याज दर देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर, २०२२मध्ये मुदत ठेवींची मुदत पूर्ण झाल्यावर त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने त्याच ठेवींचे नूतनीकरण केले. मात्र, डिसेंबर २०२३ मध्ये अचानक पैशांची आवश्यकता भासल्याने आग्रे यांनी शाखेत पैसे काढण्याची मागणी केली. पण मॅनेजरने त्यांना पैसे उपलब्ध नाहीत असे सांगितले आणि प्रतीक्षा करण्यास सांगितले. यामुळे आग्रे यांना संशय आला. आग्रे यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयात संपर्क साधला, परंतु कोणाकडूनही ठोस माहिती मिळाली नाही.

२०२४ मध्ये संस्थेने गणेश मंगल कार्यालयातील सभेत २५ % रक्कम लवकरच परत करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते आश्वासन पूर्ण झाले नाही. त्यानंतर, मासिक ५% रक्कम देण्याचे आश्वासन दिले होते, पण फक्त दोन महिनेच २% रक्कम मिळाली. आग्रे यांनी २१ एप्रिल २०२५ रोजी वकिलांमार्फत नोटीस पाठवून संस्थेने पैसे परत करण्याची मागणी केली होती, परंतु संस्थेने या आरोपांना फेटाळले. यामुळे त्यांनी पारनेर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून, चेअरमनसह संचालक मंडळातील सदस्यांनी संगनमताने ठेवीदारांचे पैसे लुबाडून त्यांची फसवणूक केल्याचा आरोप केला आहे. तसेच अन्य २९ ठेवीदारांच्या देखील कोट्यावधी रुपयांची फसवणूक झाल्याचा दावा आहे. ठेवीदारांनी संस्थेच्या व्यवस्थापनावर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. पारनेर पोलिस स्टेशनने संस्थेच्या व्यवस्थापनावर फसवणुकीची फिर्याद नोंदविली असून, तपास सुरू केला आहे.

### कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.१४, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत पुष्कर केशव नाईक, घर नं ३२८, बोनकोडे, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये दिनांक ०७ जानेवारी २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली. सदर बांधकाम धारकांकडून रुपये २५०००/- चा दंड वसूल करण्यात आला आहे. सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी, कर्मचारी व नमुंमपा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी मजूर, इलेक्ट्रॉनिक हॅमर, पिकअप व्हॅन, गॅस कटर यांचा वापर करण्यात आला. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

### शेंद्रा बिडकीन बायपास जोडणी मार्गासह सुधारीत प्रस्ताव सादर करा - मंत्री अतुल सावे

**दि.१३, छ.संभाजीनगर :** शहराचा वाढता विस्तार व संलग्न औद्योगिक वसाहतीत येऊ घातलेले नवे उद्योग पाहता शहराच्या रहदारीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी शेंद्रा बिडकीन बायपास रस्त्याचा तयार केलेल्या प्रस्तावात रस्ता जोडणीच्या नव्या सुचनांसह सुहारीत प्रस्ताव सादर करावा,असे निर्देश राज्याचे इमाव कल्याण, अपांपारिक उर्जा मंत्री अतुल सावे यांनी आज संबंधित यंत्रणांना दिले. शेंद्रा बिडकीन बायपास या रस्त्याच्या कामासंदर्भात आज श्री.सावे यांनी संबंधित यंत्रणांची बैठक बोलावली होती. बैठकीस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाचे व्यवस्थापक संघर्ष मेशाम, अधीक्षक अभियंता अनिकेत कुलकर्णी, कार्यकारी अभियंता सुर्यकांत गलांडे, ऑरिक सिटीचे उप महाव्यवस्थापक शैलेश धाबरकर, प्रकल्प व्यवस्थापक अरुण दुबे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरेकर, हिरासिंग ठाकूर आदी उपस्थित होते. सद्यस्थितीत प्रस्तावित शेंद्रा बिडकीय बायपास रस्ता हा ३५ किमी लांबीचा असून हा प्रस्ताव २०१७ पासून तयार करण्यात आला आहे. येत्या कालावधीत हा प्रकल्प पूर्ण होईस्तोवर शहराचा विस्तार आणखीन वाढेल तसेच अधिक उद्योग या दरम्यान आलेले असतील. तसेच या प्रकल्पात आता धुळे सोलापूर महामार्ग, समृद्धी महामार्ग, वाळूज औद्योगिक वसाहत तसेच अहिल्यानगर, पुणे कडे जाणारा रस्ता या सर्व रस्त्यांना प्रस्तावित मार्गाची जोडणी असणे आवश्यक आहे. याबाबीचा अंतर्भाव या प्रकल्पात करावा. तसेच आगामी कालावधीत पुर्वेकडून जालना येथील ड्रायपोर्ट व पश्चिमेकडून वाढवण बंदर हे दोन प्रकल्प पूर्ण होताच या मार्गावरील रहदारीचे, मालवाहतुकीचे प्रमाण वाढणार आहे. या सर्व मुद्यांचा विचार करुन सुधारीत प्रस्ताव त्वरीत सादर करावा, असे निर्देश श्री.सावे यांनी दिले.

# संपादकीय



## प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

मुंबई उपनगरी रेल्वे वाहतूक अर्थात मुंबईची लोकलसेवा ही मुंबईची जीवनवाहिनी समजली जाते. दररोज पाऊण कोटीहून अधिक मुंबईकर लोकल सेवेने प्रवास करतात. मात्र आज हीच मुंबईकरांची जीवनवाहिनी मुंबईकरांसाठी मृत्युवाहिनी ठरत आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. नुकतीच मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर मुंबईतील लोकल वाहतूक करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. अर्थात लोकल दुर्घटनेत मुंबईकरांचा जीव जाण्याची ही पहिली वेळ नाही. या आधीही अनेकांनी अशा दुर्घटनेत आपला जीव गमवला आहे. रेल्वे अपघातात दररोज पाच ते सात जणांचा मृत्यू होतो असा एक अहवाल सांगतो याचाच अर्थ रेल्वेचा प्रवास आता पूर्वी इतका सुरक्षित राहिला नाही. या दुर्घटनेनंतर नेहमीप्रमाणे राजकीय पक्षांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली. रेल्वे मंत्रालयाने या दुर्घटनेनंतर सर्व लोकलना स्वंयचलीत दरवाजे बसवण्याचे घोषित केले तर मुख्यमंत्र्यांनी सर्व लोकल वातानुकूलित करून लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्याची घोषणा केली. लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्यास अनेकांनी विरोध केला. लोकलमधील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्वयंचलित दरवाजे हा उपाय योग्य ठरणार नाही. स्वयंचलित दरवाज्यामुळे घुसमट होऊन लोकलमधील प्रवाशांचा जीव गुदमरणार नाही का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो आणि तो योग्यही आहे. सर्वच लोकल वातानुकूलित करण्यास ही विरोध होतोय कारण लोकल वातानुकूलित केल्यावर तिकिटांचा दर वाढेल पर्यायाने सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा येऊ शकते. मुंब्रा दुर्घटनेनंतर अशी दुर्घटना घडू नये यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या जात आहेत त्याचे स्वागतच व्हायला हवे मात्र मूळ प्रश्न हा मुंबईतील वाढत्या लोकसंख्येचा आहे. वाढत्या लोकसंख्येपुढे सर्वच साधनसामुग्री अपुरी पडत आहे. मुंबईत परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत केवळ परप्रांतीयच नाही तर खेड्यातूनही हजारो लोक मुंबईत रोजगारासाठी स्थलांतर करत असतात त्यामुळे मुंबईची सूज वाढत चालली आहे. कितीही आणि कोणत्याही उपाययोजना केल्या तरी त्या वाढत्या लोकसंख्येपुढे अपुऱ्याच ठरणार आहे. त्यामुळेच शहरांचा नव्याने पुनर्विकास करण्याची गरज आहे मी माझ्या ' शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा! ' या लेखातच हे लिहिले आहे. जोवर शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणार नाही तोवर अशा घटना घडतच राहणार आणि त्यात मुंबईकरांचा जीव जातच राहणार आहे.

# जीवनात एकतरी वारी अनुभवावी !



अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे, आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।, असे म्हटले जाते.

संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणार्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणार्या वारकर्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी ! श्रीक्षेत्र आळंदी आणि देहू येथून निघणार्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अन् जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव ! ऊन-पावसाची तमा न बाळगता भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळ-मृदुंगाचा गजर करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचेच प्रतीक ! कोणाच्याही तोंडवळ्यावर चिंता नाही कि मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांची अपेक्षा नाही. वारकर्यांना प्रतिदिन १० ते २० किलोमीटरचा टप्पा चालत पार करावा लागतो. सकाळी लवकर मार्गस्थ व्हावे लागते. अल्पाहार आणि महाप्रसादही वाटेतच घ्यावा लागतो. सायंकाळी विलंबाने मुक्कामाच्या ठिकाणी पोचल्यानंतर भजन-कीर्तन होऊन दिवसाची समाप्ती होते.विठुमाऊली तू माऊली जगाची । माऊलीच मूर्ती विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा ।। असा वारकऱ्यांचा पंढरीच्या विठुरायाप्रती असलेला भाव जगात सुविख्यात आहे. विठ्ठल विठ्ठल, जय हरि विठ्ठल, असे विठ्ठलाला आळवत वारकरी प्रतिवर्षी वारीला जातात आणि परत आल्यावर स्वतःपुरतीच नव्हे, तर परिसरातही विठ्ठलाची उपासना करतात. वर्षभर प्रपंचात म्हणजेच मायेत गुंतलेल्या जीवाला वारीमार्गात येणारे अनुभव आणि अनुभूती जीवनाचे सार सांगून जातात. वारीच्या अंतिम चरणी जेव्हा पांडुरंगाचे दर्शन घडते तेव्हा तो अनुपम्य सोहळा कधीच संपू नये असे वाटते. ज्या क्षणी जीव शिवाचे मिलन घडते तो क्षण स्वर्गीय आनंदाचा अनुभव देतो. एरव्ही आरामदायक चारचाकीतून प्रवास करून पंढरपूरला जाणे आणि वारीत सहभागी होऊन माउलीला भेटणे यातील भेद वारकरीच सांगू शकत. या भेटीला कोणत्याही ऐहिक सुखाची सर नाही. हा आनंद जीवनात एकदा तरी घ्यावा. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी.

(संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)



जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

# शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या उद्यानदुतांचे सुखेड ग्रामस्थांनी केले उत्सहात स्वागत

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१४, खंडाळा (सातारा) :** फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय, फलटण येथील सातव्या सत्रातील उद्यानदुत प्रशिक्षणासाठी सुखेड ता. खंडाळा जि. सातारा येथे दाखल झाले असुन सुखेड ग्रामपंचायत येथे सरपंच, उपसरपंच, कृषि सहायक, तलाठी, ग्रामसेवक व ग्रामस्थांनी या उद्यानदुत विद्यार्थ्यांचे उत्स्फुर्त स्वागत केले.

ग्रामीण उद्यानविदया कार्यानुभव कार्यक्रम ांतर्गत सुमारे २२ आठवडे सुखेड येथे वास्तव्यास राहणार असलेले हे विद्यार्थी शेतकऱ्यांना शेतिविषयक माहिती, नवीन तंत्रज्ञान याबाबत माहिती देऊन गावामध्ये शेतिविषयक विविध उपक्रम व कार्यक्रम राबविणार आहेत. माती




परीक्षण, फळबाग लागवड, एकात्मिक कीड रोग, बीज प्रक्रिया, आधुनिक शेती औजारांचे वापर, शेतीचा आर्थिक फायदा, जनावरांचे लसीकरण, आदीबाबत उपस्थित गावकरी व शेतकऱ्यांशी संवाद साधणार असल्याचे या उद्यानदुतांनी सांगितले.

उद्यानविद्या विषयक जनजागृती करण्यास उद्यानविदया कार्यानुभव यांचा अभ्यास उद्यानकदुत करणार आहेत. विश्वजित तोरडमल, उत्कर्ष कदम, विनायक पवार, क्षितिज जंगम, रिषभ काळे, संकेत बारडोल हे उद्यानदूत येथे दाखल झाले आहेत. त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन सरपंच रविंद्र धायगुडे, ग्रामविकास अधिकारी आटोळे, गावातील शेतकरी संग्राम धायगुडे, दत्तात्रय धायगुडे, संदीप रासकर, प्रविन कोकीळ,गणपत वळकुंदे, रामभाऊ धायगुडे, हणुमंत धायगुडे, अक्षय कुंभार ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थ यांनी यावेळी दिले.

उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. निंबाळकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यु. डी. चव्हाण, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. जे व्ही. लेंभे व प्रा. ए. डी. पाटील यांचे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

## घाटकोपरमध्ये गरजू विद्यार्थांना वह्यांचे वाटप



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१४, घाटकोपर (मुंबई) :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शाखा क्रमांक १२५ चे शिवसैनिक, सामाजिक कार्यकर्ते सतीश पवार यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त आज घाटकोपर मधील गरजू विद्यार्थ्यांना मोफत हजारो वह्यांचे वाटप करण्यात आले. शिवसेना पक्षाचे ईशान्य मुंबईचे विभाग प्रमुख सुरेश पाटील यांच्या हस्ते मुलांना वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी उप विभाग प्रमुख अजित गुजर, अजित भायजे, शाखा प्रमुख मयुरेश नामदार, विशाल चावक विधानसभा कार्यालय प्रमुख प्रकाश वाणी, महाराष्ट्र सचिव शिक्षक संघटना सचिन भांगे, संतोष पिंगळे, विधानसभा संघटक अशोक वंडेकर, चंद्रकांत हळदणकर उपस्थित होते. सतिश पवार हे घाटकोपर मधील सामाजिक कार्यकर्ते असून विविध गरजू विद्यार्थ्यांसाठी ते शैक्षणिक साहित्य पुरवण्याचे कार्य करतात.

## खुळ्यात...

कार्यचालले नेत्यांचे
तळ्यात न् मळ्यात
पाहते चाळे जनता
गणनाकरे खुळ्यात

तरबेज राजकारणी
हळू ओढे जाळ्यात
भुरळ पडते सत्तेची
खुर्ची खुपे डोळ्यात

भरगच्च भरते सभा
जीवगुंतले टाळ्यात
शिळी होई हार फुले
हारचं पडते गळ्यात

कार्यकर्ता गोंधळला
अश्या वेड चाळ्यात
कुणाचे फोटो लटकू
सांग एका खिळ्यात

कुठला रंग निवडावा
फरक हाचं टिळ्यात
सन्मान ऐवज हरला
लुटारूंच्या टोळ्यात

वरुनि गोंडस कमळे
गाळ भरला तळ्यात
हातोहात फसवे हात
बोटे घुसवे डोळ्याते

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# शासकीय पॅनलवर खाजगी रुग्णालयांची संख्या वाढवा : डॉ. शेटे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** नागरिकांच्या आरोग्याला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. केंद्र शासनातर्फे आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनातर्फे महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना राज्यात एकत्रितपणे २३ सप्टेंबर २०१८ पासून राबविण्यात येत आहे.

या योजनांची आणखी प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठीव गरजू रुग्णांना योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासकीय पॅनलवर खाजगी रुग्णालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने आरोग्य विभागाने नियोजन करावे, अशा सुचना आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्रित प्रधानमंत्री आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी आमदार देवराव भोंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, मा.सां. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अविष्कार खंडाते, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके, महानगर पालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. नयना उत्तरवार आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री आयुष्मान भारत प्रधानमंत्री व महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत १३५६ आजारांवर उपचार व शस्त्रक्रियांचा समावेश आहे, असे सांगून डॉ. शेटे म्हणाले, यात आणखी




आजारांचा समावेश करण्यात येणार आहे. रुग्णांना स्थानिक स्तरावरच तात्काळ चांगली आरोग्य सेवा मिळावी, असा शासनाचा मानस आहे. त्यासाठीच जास्तीत जास्त खाजगी रुग्णालयांना शासकीय पॅनलवर समाविष्ठ करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. पॅनलवर येणाऱ्या खाजगी रुग्णालयांसाठी चांगले पॅकेज तयार करण्यात येत असून सदर निधी ३० दिवसांत संबंधित रुग्णालयाला वळता करण्यात येईल. आरोग्यासाठी शासन स्तरावरून निधीची कमतरता होणार नाही. पुढे ते म्हणाले, चंद्रपूर हा आदिवासी बहुल जिल्हा असल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना चांगली आरोग्य सेवा पुरविणे हे आपले कर्तव्य आहे. त्यामुळे शासकीय पॅनलवर खाजगी रुग्णालयांचा समावेश होण्यासाठी जास्तीत जास्त रुग्णालयांकडून अर्ज मागवा. तसेच अर्ज आलेल्या रुग्णालयांना संवेदनशीपणे समाविष्ठ करून घ्या, असेही डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले.

### ही आहेत चंद्रपूर जिल्ह्यातील पॅनलवरील रुग्णालये...

चंद्रपूर जिल्ह्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री व महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत एकूण २३ रुग्णालय अंगीकृत असून यात १५ शासकीय रुग्णालय तर ८ खाजगी रुग्णालय आहेत.

शासकीय रुग्णालयांमध्ये चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालय, चिमूर, मूल, राजुरा आणि वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालय तसेच बल्लारपूर, भद्रावती, गोंडपिपरी, गडचांदूर, कोरपना, नागभीड, पोंभुर्णा, सावली, सिंदेवाही आणि ब्रम्हपुरी येथील ग्रामीण रुग्णालयांचा समावेश आहे. तर खाजगी रुग्णालयांमध्ये चंद्रपूर येथील कोल सिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, क्रीस्ट हॉस्पीटल, गाडेगोणे आर्थोपेडीक हॉस्पिटल, मानवटकर हॉस्पीटल, मुसळे हॉस्पीटल, वासाडे हॉस्पीटल, चिमूर येथील शीहरी नेत्रालय आणि ब्रम्हपुरी येथील यशलोक हास्पीटल यांचा समावेश आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सुट्टीवर आलेल्या जवानाचा विजेच्या धक्याने मृत्यू !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मंठा (जालना) :** गावात सुट्टीवर आलेल्या जवानाचा विजेच्या शॉकने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंठा तालुक्यातील गारटेकी येथे घडली. पवन शेषराव पवार (वय ३३) असे या जवानाचे नाव आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (ता. १४) शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

या वेळी आर्मीचे वरिष्ठ अधिकारी, पोलिस व महसूल प्रशासनाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. पोलीस प्रशासनाने हवेत गोळीबाराच्या सात फैरी झाडून साश्रुनयनाने अंतिम सलामी दिली. या अंत्यविधीस राजकीय नेते, प्रशासनातील अधिकारी तसेच परिसरातील हजारो ग्रामस्थ उपस्थित होते.

पवन पवार हे मागील १२ वर्षांपासून सैन्य सेवेत कार्यरत होते. दोन दिवसांपूर्वीच ते सुट्टीवर गावी आले होते. शुक्रवारी (ता. १३) दुपारी पावणे चारच्या सुमारास ते घरा शेजारी असलेल्या झाडांच्या फांद्या छाटत होते. यावेळी घरावरून गेलेल्या विद्युत तारांचा त्यांना धक्का बसला. नातेवाईकांनी तातडीने त्यांना मंठा येथील शासकीय रुग्णालयात हलवले; मात्र उपचारादरम्यान सायंकाळी सातच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

पश्चात त्यांच्या पत्नी, एक मुलगी, आई-वडील, एक भाऊ व एक बहीण असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकस्मात निधनाने गारटेकी गावावर शोककळा पसरली असून देशाचा एक शूर जवान हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांच्याकडून पालखी मार्ग व तळावरील कामांची पाहणी



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१४, सोलापूर :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील पालखी मुक्कामाची ठिकाणी, विसावा ठिकाणी तसेच पालखी मार्गावर करण्यात आलेल्या कामांची पाहणी केली. तसेच पालखी तळावर आवश्यक त्या ठिकाणी मुरमीकरण, सपाटीकरण याची पाहणी केली.

तसेच मुक्काम व विसावा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाऊस आल्यानंतर जलावरोधक मंडप कोणत्या ठिकाणी उभे केले जाणार आहेत या अनुषंगाने माहिती घेऊन वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाही यासाठी प्रशासनाने काळजी घेण्याबाबत त्यांनी सूचित केले.

नातेपुते, सदाशिवनगर, माळशिरस, वेळापूर, भंडीशेगाव, वाखरी, पिराची कुरवडे, बोरगाव, अकलूज सराटी या सर्व पालखी मुक्काम ठिकाणाची पाहणी विभागीय आयुक्त. पुलकुंडवार यांनी केली. यावेळी माळशिरसचे तहसीलदार सुरेश शेजुळ, पंढरपूर तहसीलदार सचिन लंगुटे, अधीक्षक अभियंता संजय माळी, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे रोकडे. तसेच संबंधित तलाठी ग्रामसेवक व सरपंच आदी उपस्थित होते.

## अतिधोकादायक इमारतींचे लाईट, पाणी, ड्रेनेज बंद

**अक्षराज : जे. के . पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** महानगरपालिका सी विभाग वाशी कार्यक्षेत्रातील सी-१ (अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्काषित करणे) या प्रवर्गात घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आदेशान्वये व उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार कोणत्याही प्रकारची हानी होऊ नये यांची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने वाशी विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त सुखदेव येडवे यांच्या नियंत्रणाखाली ३ अतिधोकादायक इमारतींचा पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व मलनि:स्सारण वाहिनी खंडीत करण्यात आलेली आहे.

**यामध्ये समावेश असणाऱ्या इमारती :**

(१) जय महाराष्ट्र सोसा., जे एन-२ टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, भु.क्र.४, से-०९, वाशी

(२) लिटिल फ्लॉवर को.ऑप.हौ.सो. लि., जेएन-४ टाईप (बिल्डिंग नं. ९) से.९, वाशी.

(३) सी १ व सी २ टाईप, बिल्डींग नं-१ ते १२, सेक्टर-०२, वाशी.

या धडक मोहिमेसाठी वाशी विभाग कार्यालयातील पाणी पुरवठा विभाग, अतिक्रमण विभाग, विद्युत विभाग व मलनि:स्सारण विभाग यांचे अधिकारी/ कर्मचारी, स्थानिक पोलिस स्टेशनचे कर्मचारी व अतिक्रमण विभागाचे पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

सध्या पावसाळा सुरु झाला असून नमुंमपा कार्यक्षेत्रातील इतर अतिधोकादायक इमारतींमध्ये रहिवास करणाऱ्या नागरिकांनी रहिवास वापर थांबवून इमारत खाली करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. यापुढील काळात अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात व्यसनमुक्ती जनजागृती संवाद

**अक्षराज : देवयानी कुलकर्णी.**

**दि.१४, पनवेल (रायगड) :** आपला माणूस दिलीप किसनराव आमले यांच्या व त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती संस्था यांच्या विद्यमाने नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे दर गुरुवारी सकाळी ११ वाजता मोफत व्यसनमुक्ती जनजागृती संवाद नविन शिकावु व लर्निंग लायसन्स काढण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यासोबतसाधला जातो.

व्यसनमुक्त जिवन ही काळाची गरज आहे व व्यसनापासून दूर राहण्यासाठी कसे प्रयत्न करावेत याचे विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन केले जाते. व्यसनामुळे आपल्या शरिरातील सर्व अवयव कसे खराब होत जातात व आपण आजारी पडतो, कुटुंबच्या कुटुंब उद्ध्वस्त होऊन संसार रस्त्यावर येतात तसेच समाजात आपले नावही खराब होत जाते. व चांगल्या सवयीमुळे आपलं आयुष्य सुखाचे समाधानाचे, भरभराटीचे होते आपल्या कुटुंबाचे होणारे हाल टळतात.म्हणून व्यसनापासून नेहमी दूर राहण्यासाठी मार्गदर्शनपर शिबिर आयोजित केले जाते. हेमागिनी पाटील प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे जिल्हा यांच्या विशेष संकल्पनेतून, दत्तात्रय सांगोलकर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई, गजानन गावंडे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई, यांच्या विशेष सहकार्याने, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विद्या शिंदे,रचना गावीत सहाय्यक सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक गणेश लव्हाटे, तुषार कदम सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांच्या उपस्थितीत व्यसनमुक्त जिवन काळाची गरज यासाठी प्रमुख मार्गदर्शक (आपला माणूस) दिलीप किसनराव आमले हे गेल्या अनेक वर्षांपासून मोफत संवाद व मार्गदर्शन सादरीकरण करीत आहेत.

# शनि शिंगणापूर देवस्थानचा मोठा निर्णय... अखेर ११४ कामगारांना कामावरून हटवले...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, शनि शिंगणापूर :** अहिल्यानगरमधील शनिशिंगणापूर देवस्थानने मोठा निर्णय घेतला आहे. शनि देवस्थान इथं कार्यरत असलेले १६७ कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले आहे. काढून टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांचा समावेश होता. अनियमितता आणि शिस्तचं पालन न केल्याच्या कारणावरुन करम्चाऱ्यांना काढण्यात आल्याचे स्पष्टीकरण शनि देवस्थानकडून देण्यात आलं आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मुस्लिम कर्मचाऱ्यांना काढण्याबाबत हिंदू संघटनांनी दबाव आणला होता. शनि देवाच्या चौथ्याऱ्यावर मुस्लिम लोकांच्या हाताने काम करुन घेतल्यामुळे सकल हिंदू समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते.

१४ जून रोजी मंदिराबाहेर संपूर्ण हिंदू समाजाकडून मोठा मोर्चा काढण्याचा दिला होता इशारा

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ श्री क्षेत्र शनि शिंगणापूर मंदिरात मुस्लिम कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरुन वाद वाढला होता. शनि शिंगणापूर मंदिर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांविरुद्ध हिंदू संघटना आक्रमक झाल्या आहेत. ट्रस्टने सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावरुन काढून टाकावे अशी संघटनेची मागणी होती. अन्यथा १४ जून रोजी मंदिराबाहेर संपूर्ण हिंदू समाजाकडून मोठा मोर्चा काढला जाईल, असा इशारा देखील दिला होता.

२१ मे २०२५ रोजी मुस्लिम कारागिरांनी मंदिराच्या पवित्र व्यासपीठावर ग्रिल बसवले आणि भगवान शनिदेवाच्या व्यासपीठाची स्वच्छता आणि रंगरंगोटी केली होती. तेव्हा हे प्रकरण अधिकच तापले होते. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि हिंदू संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला होता. त्यानंतर आता मंदिराच्या विश्वस्त मंडळाने सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत मंदिर ट्रस्टने स्पष्टीकरण दिलं होतं, त्यानुसार ट्रस्टमध्ये ११४ मुस्लिम कर्मचारी काम करतात हे मान्य केलं आहे. मात्र ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, या कर्मचाऱ्यांपैकी एकाही मुस्लिम कर्मचाऱ्याची ड्युटी मंदिराच्या मुख्य गर्भगृहात किंवा चबुतऱ्यावर नाही. हे कर्मचारी मुख्यतः शेती विभाग, कचरा व्यवस्थापन विभाग आणि शिक्षणाशी संबंधित कामांमध्ये कार्यरत आहेत.

यापैकी ९९ कर्मचारी मागील पाच महिन्यांपासून कामावर अनुपस्थित असून त्यांच्या पगारावरही आळा घालण्यात आला आहे. उरलेले १५ कर्मचारी अनेक वर्षांपासून सेवा देत आहेत, ज्यात काहींचा अनुभव २० वर्षांहून अधिक आहे. शनि शिंगणापूर मंदिर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकावे या मागणीसाठी हिंदू संघटना आक्रमक झली होती. याबाबत आज (१४ जून) मोर्चा काढण्याचाही इशारा दिला होता.

# हिमायतनगरमध्ये मृग नक्षत्राची जोरदार एंट्री ! वादळवाऱ्याने उडवली झोप, शहर अंधारात...

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.१४, हिमायतनगर :** हिमायतनगर शहर व परिसरात रविवारी सायंकाळी मृग नक्षत्राच्या पहिल्या पावसाने जोरदार हजेरी लावली. वादळी वाऱ्यासह आलेल्या या मुसळधार पावसामुळे संपूर्ण शहरातील जनजीवन विस्कळीत झाले.

तासाभर सुरू असलेल्या या पावसामुळे अनेक भागांमध्ये झाडे कोसळली, परिणामी विद्युत पुरवठा खंडित झाला आणि नागरिकांना अंधारातच रात्र काढावी लागली. वाऱ्यामुळे काही घरांचे छप्पर उडाले, तर बाजारपेठांतील व्यापाऱ्यांचे देखील आर्थिक नुकसान झाले.



शहराप्रमाणेच परिसरातील शेतकऱ्यांनाही या वादळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. विशेषतः केळी व आंबा पिकांचे नुकसान झाले असून काही ठिकाणी शेतीचे वस्तीगाळेही उध्वस्त झाले आहेत.

मात्र, ज्या शेतकऱ्यांनी मशागतीची कामे पूर्ण केली होती, त्यांच्यासाठी हा पाऊस सुखद ठरला असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव पाहायला मिळाले. मे महिन्यातच आलेल्या अवकाळी पावसानंतर मागील चार-पाच दिवसांपासून थांबलेल्या पावसाने पुन्हा जोरदार हजेरी लावल्याने उकाड्याने त्रस्त नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

**: पावसामुळे परिस्थिती :**

झाडे कोसळल्याने वीजपुरवठा खंडित..

घरांचे आणि दुकानदारांचे नुकसान...

केळी-आंबा पिकाचे नुकसान...

मशागत पूर्ण शेतकऱ्यांना दिलासा...

# पनवेल मनपा राबविणार 'स्टॉप डायरिया मोहीम'



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, पनवेल :** पाच वर्षांखालील बालकांमध्ये डायरियामुळे होणारे मृत्यू पूर्णपणे थांबविण्याचे उद्दिष्ट ठेऊन 'स्टॉप डायरिया मोहीम' देशभरात राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत झिंक आणि ओआरएसचा प्रभावी वापर, पालकांमध्ये योग्य माहिती व सवयी रुजविणे, तसेच गरजू व संवेदनशील भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रात ही मोहिम यशस्वीरित्या राबविण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १३ जून रोजी महापालिका मुख्यालयात उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस माता बाल आरोग्य अधिकारी डॉ. गणेश नाईक, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका उपस्थित होत्या.

एकही बालकाचा अतिसारामुळे (डायरिया) मृत्यू होऊ नये यासाठी 'स्टॉप डायरिया' ही मोहीम राबविण्यात येत असून, या मोहिमे अंतर्गत ज्याप्रमाणे महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील ओआरएस व झिंक कॉर्नर आहेत त्याप्रमाणे महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाड्यामध्ये ओआरएस व झिंक कॉर्नर उभारण्याबाबत उपायुक्तांनी निर्देश दिले. तसेच अतिसार होऊ नये यासाठी प्रसार माध्यमातून जनजागृती करण्याबाबत उपायुक्तांनी सूचना दिल्या.

पाच वर्षांखालील बालकाला (उपचारासाठी) डायरिया सुरू होताच लगेचच ओआरएस द्यावे. झिंक सलग १४ दिवस द्यावे. आईने स्तनपान सुरू ठेवावे. उकळून शुद्ध केलेले पाणी पिण्यास वापरावे. बालकाची लघवी व विष्ठा नीट साफ करावी. स्वयंपाक करताना हात स्वच्छ धुवावेत.

**खालील लक्षणे दिसल्यास,**
**त्वरित आरोग्यकेंद्रात जावे...**

१. मुलाची तब्येत अधिक बिघडणे
२. पाणी पिण्यास किंवा दूध पिण्यास नकार
३. विष्ठेत रक्त
४. ताप येणे

**मिझल्स व रूबेला लसीकरण मोहीम राबविणार**

भारत सरकारने २०२६ पर्यंत देशातून मिझल्स आणि रुबेला या आजारांचे निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने मिझल्स व रुबेला निर्मूलन मोहीमेचा प्रारंभ करण्यात आला आहे. या मोहिमेंतर्गत एमआर- १ आणि एमआर - २ लसीकरणावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

या लसीकरणांतर्गत महापालिकेच्यावतीने मिझल्स व रूबेला लसीचे दोन्ही डोस न मिळालेल्या, अपूर्ण किंवा गाळले गेलेल्या लाभार्थ्यांना शोधून त्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे. तसेच मिझल्स व रुबेला निर्मूलनासाठी विशेष लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे.

# करिअरकडे लक्ष द्या सोशल मीडियापासून दूर राहा..

## नगरसेविका नंदिनी विचारे यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन...



**अक्षराज तानाजी ताकतोडे**

**दि.१४, ठाणे :** जग अत्यंत वेगवान झाले असून आता एका क्लीकवर माहिती मिळवता येते. तंत्रज्ञान अत्यंत प्रगत झाले असताना याचा सदुपयोग विध्यार्थ्यांनी केला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी नुकतीच सोशल मीडिया संदर्भात लक्ष वेधले आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यानो आपल्या करिअरकडे लक्ष द्या आणि सोशल मीडियापासून थोडेसे दूर राहा असा मोलाचे मार्गदर्शन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या माजी नगरसेविका नंदिनी विचारे यांनी विध्यार्थ्यांना आज केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाणे महापालिका प्रभाग क्रमांक १२ सिद्धेश्वर तलाव परिसरातील १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तरुण मुलींना कॉलेजमध्ये स्वरक्षणासाठी स्वबळावर तयार व्हा असा मौल्यवान सल्ला त्यांनी दिला.

सिद्धेश्वर तलाव परिसरात राहणाऱ्या व परिस्थितीशी झुंज देऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा दरवर्षी सत्कार करून त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देत असतात. अशा विध्यार्थ्यांच्या मागे शिवसेना नेहमीच उभी असल्याचा विश्वास यावेळी नंदिनी विचारे यांनी पालकांना दिला. तसेच प्रभागातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार ही यावेळी करण्यात आला यावेळी कार्यक्रमासाठी मेघा विचारे, ऋतुजा शिंत्रे, अश्विनी कानोलकर, वनिता कोळी, सुनंदा देशपांडे, गौरी ताम्हणकर, सुवर्णा साळुंखे व इतर पदाधिकारी व पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'कुरनूर'च्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर

## दुरूस्तीच्या कामाची आमदार पाटील यांच्याकडून पाहणी

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१४, धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील कुरनूर मध्यम प्रकल्पातील पाणी वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी आहे. दुरूस्तीअभावी अनेक ठिकाणी कालव्याला गळती लागली होती. त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाण्याचे वितरण होत नव्हते. परिणामी ३,५०० हेक्टर क्षेत्राला त्याचा फटका सहन करावा लागत होता.

वितरण व्यवस्थेत सुधारणा, अस्तरीकरण आणि बांधकाम दुरूस्तीसाठी हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारकडून आपण मिळवून घेतलेल्या २९ कोटी ६५ लाख रुपयांच्या निधीतून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु आहे.

कामाची पाहणी करून जलसंपदाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.या कामामुळे १० गावांतील ३ हजार ६४३ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार आहे. कुरनूर मध्यम प्रकल्पाचा मुख्य कालवा आणि वितरिकेमार्फत प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील नळदुर्ग, अणदूर, चिवरी, गुजनूर, खुदावाडी, सराटी, शहापूर, वागदरी आणि बाभळगाव आदी १० गावांना शेतीसाठी कालव्याद्वारे पाणी दिले जाते. १० गावांतील ३ हजार ६४३ हेक्टर क्षेत्र या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र प्रकल्पाची वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी होती. आजवर झालेला वापर, कालव्याची वेळेवर न झालेली दुरूस्ती, अशा अनेक कारणांमुळे पाण्याचा विसर्ग ५० टक्क्यांवर आला होता.

कालवा भरावातून, बांधकामातून अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाण्याला गळती लागली आहे. त्यामुळे कालव्याच्या शेवटच्या भागात असलेल्या शेतकर्यापर्यंत उपलब्ध असलेले पाणी पोहोचण्यास मोठी अडचण निर्माण झाली होती. सिंचन अवर्तनाचा कालावधीही वाढल्याने सिंचन क्षेत्रात मोठी घट झाली असल्याचे



निदर्शनास आले होते.

अनेक ठिकाणी शेवटच्या टोकाला कालवा बुजविला गेल्याचे स्थानिक शेतकरी बांधवांनी निदर्शनास आणून दिले होते. मागील ५५ वर्षांत या कालव्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे परिसरातील गावांना तोटा सहन करावा लागत आहे. अनेक शेतकरी बांधवांनी उपोषण केले. अनेकांनी आत्मदहनाचे पत्र दिले. रब्बी आणि उन्हाळी हंगामात कालव्याच्या नादुरूस्तीमुळे अनेकांच्या पिकाला पाणी मिळू शकले नाही.

त्यामुळे या प्रकल्पातून पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली घट दूर होवून सिंचन क्षेत्र वाढावे,याकरिता वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरण आणि त्यावरील बांधकाम दुरूस्तीसाठी महायुती सरकारकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी त्यासाठी तब्बल २९ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे कालव्याच्या लाभ क्षेत्रातील वरील १० गावांमधील शेकडो शेतकरी बांधवांची मागणी महायुती सरकारमुळे पूर्ण झाली आहे. अस्तरीकरण आणि बांधकामाच्या कामाची निविदा ७ ऑक्टोबर रोजी जाहीर झाली. मागील ५० वर्षांपासून दुरूस्तीअभावी रखडलेल्या कुरनूर मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम आता युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे या क्षेत्रातील शेतकर्यांना पुन्हा त्यांच्या हक्काचे पाणी लवकरच मिळणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.दुरुस्ती कामात टेक्निकल टेक्स्टाईलचा पेपर –

आपल्या महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने जिल्ह्यावरती प्रचंड लक्ष दिले आहे. त्यातील महत्वाचे प्रकल्प म्हणजेच कुरनूर मध्यम मध्यम प्रकल्पाच्या कालवा देखभाल आणि दुरुस्तीच्या अनुषंगाने पूर्ण लायनिंग करून घेणे. सिमेंटचे लाईनींग करण्यात येणार आहे. याच बरोबर इतर जे कॅनाल आहेत त्याचे देखील काम दोन टप्यात घेण्यात येणार आहे. टप्पा क्र. १ मध्ये कुरनूर मध्यम प्रकल्पाचा १० किमी मुख्य कालवाचे मातीकाम, त्यावरील बांधकामे व अस्तरीकरण करण्यात येत आहे. तसेच वितरिका, शाखा कालवा व लघु वितरीकांचे मातीकाम व त्यावरील बांधकामाचे एकूण – २४.४३ कि.मी.काम प्रगतीतथावर आहे टप्पा क्र. २ मध्ये एकूण – २०.८७ कि.मी. मुख्य कालव्यावरील वितरिका,शाखा कालवा व लघु वितरीकांचे मातीकाम व त्यावरील बांधकामे करणे नियोजित आहे.

या धरणातून शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत मूळ नियोजनाप्रमाणे पाणी पोहोचणे अपेक्षित होते. तिथपर्यंत पाणी पोहोचवण्याची सोय दोन टप्यात पूर्ण होणार आहे. येत्या रब्बी हंगामात शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. उर्वरित काम पुढच्या वर्षी घेण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. काम सध्या युद्ध पातळीवर सुरु असून जिथे गळती होती तिथे सिमेंटचे काम करण्याच्या आधी विशिष्ट पद्धतीचे टेक्निकल टेक्स्टाईलचा पेपर वापरला जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले.

# पत्रकार परिषदेचे पत्रकारांचे प्रश्न सोडण्याबाबत शासनाला निवेदन

## पत्रकार कल्याण निधीच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने विविध पत्रकार संघटनांकडून अभिप्राय, सूचना मागवल्या आहेत. त्यानुसार मराठी पत्रकार परिषदेच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी आणि डिजीटल मीडिया परिषदने पत्रकारांचे प्रश्न सोडवण्याबाबत शासनाला निवेदन देऊन सूचनावजा मागणी केली आहे. सदर मागणीचे निवेदन जिल्हा माहिती अधिकाऱ्याना देण्यात आले.

राज्यातील पत्रकारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्याबाबत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सचीव सुरेश नाईकवाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा शासनाकडे पत्रकारांच्या प्रश्नाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

पत्रकारांचे प्रलंबीत प्रश्न सुटावेत या अनुषंगाने राज्य शासनाने आचार्य बाळाशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील अटी शर्तीबाबत, तसेच शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या तरतुदीमध्ये आवश्यक सुधारणा, आजारपणासाठीच्या मदत निधीबाबत सुधारणा, योजनेमध्ये कोणत्या आजाराचा समावेश असावा, पत्रकारांच्या मृत्यूनंतर वारसांना द्यावयाची मदत किती असावी आदी बाबत विविध पत्रकार संघटनांचे मागण्या, मत आणि सूचना जिल्हा माहिती अधिकाऱ्यांमार्फत



मागवल्या आहेत.

त्यानुसार अहिल्यानगर येथे मराठी पत्रकार परिषदेचे कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, अधिस्विकृती समितीच्या नाशिक विभागाचे सदस्य विजयसिंह होलम, परिषदेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके, हल्ला कृती समितीचे समन्वयक बंडू पवार, आफताब शेख, बाबा ढाकणे, सचिन मोळक दिपक वाळुंजकर, मोहसीन शेख यांनी माहिती अधिकार अमोल महाजन यांच्याकडे निवेदन देऊन शासनाने पत्रकारांच्या विविध प्रलंबित मागण्या सोडवाव्यात आणि आचार्य बाळशास्त्री जांभेकर जेष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील अटी शिथिल करण्याबाबत तसेच शंकरराव चव्हाण निधीच्या तरतुदीमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबतच्या सूचना निवेदनातून केल्या आहेत.

# केएलई कॉलेज जवळ कचरा टाकणाऱ्यांवर महापालिकेची कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, पनवेल :** महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांनी केएलई कॉलेज परिसरात सातत्याने कचरा टाकणाऱ्या कळंबोलीतील रहिवासी लक्ष्मीनारायण यादव यांच्यावर कडक कारवाई केली आहे.

पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून यादव यांनी कचरा टाकणे सुरूच ठेवले होते. अखेर त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने कळंबोली पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली असून, नियमानुसार यादव यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.




आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जात आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांनुसार शहरात स्वच्छता राखण्यासाठी पालिकेचे सफाई कर्मचारी सातत्याने सफाई करत असतात. या पार्श्वभूमीवर ही कारवाई अत्यंत महत्त्वाची आहे.

शहरात सार्वजनिक स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने नागरिकांनी महापालिकेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता तो योग्य पद्धतीने कचरा कुंडीत टाकावा, असे आवाहन उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी महापालिकेच्या वतीने केले आहे.

# पारनेर येथे आज ई - नाम मार्गदर्शन प्रशिक्षण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर येथिल कृषी उत्पन्न बाजार समिती आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज रविवार, दिनांक १५ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजता मुख्य बाजार आवारात राष्ट्रीय कृषी बाजार (ई– नाम) अंतर्गत मार्गदर्शन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर यांनी दिली.

केंद्र शासनाच्या ई – नाम धोरणामुळे शेतकऱ्यांना शेतमाल विक्री आणि नियोजनात मोठा फायदा होणार आहे. या प्रशिक्षणात गाढे अभ्यासक प्रा. रंगनाथ कटरे हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या धोरणामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक लाभ होण्यास मदत होईल, असे सभापती किसनराव रासकर यांनी सांगितले.

यावेळी तालुक्यातील शेतकरी, व्यापारी, अडते, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठेची माहिती मिळावी. यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. उपसभापती किसनराव सुपेकर आणि संचालक मंडळाने तालुक्यातील शेतकरी बांधव, विविध कार्यकारी सेवा संस्थेचे पदाधिकारी, व्यापारी आणि अडत्यांनी या प्रशिक्षणात मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# थोडक्यात

## दिवा पोलीस चौकीत महिला पोलीस अधिकारी तात्काळ, कायमस्वरूपी द्या

### भाजपच्या सपना भगत यांची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, दिवा :** दिवा पोलीस चौकी मध्ये कायमस्वरूपी महिला पोलीस अधिकारी नियुक्त करावा जेणेकरून येथील महिला वर्गाला त्यांच्या तक्रारी व अडचणी दिव्यातच नोंदवता येतील, असे सांगत भाजपच्या सपना भगत यांनी दिवा पोलीस चौकीत कायमस्वरूपी महिला पोलीस अधिकारी नेमण्याची मागणी केली आहे. सपना भगत म्हणाल्या की, दिवा शहरात महिलांवर होणाऱ्या अन्यायाचे प्रमाण वाढले आहे. असे असताना देखील दिवा पोलिस चौकी मध्ये एकही महिला पोलिस अधिकारी नाही. तीन दिवसा पूर्वी एका महिलेवर रात्रीच्या वेळी अत्याचार झाल्याची घटना घडली असता, सदर महिला रात्री १.३० वाजता पोलिस चौकीत गुन्हा दाखल करण्यास आली. त्यावेळी महिला पोलिस अधिकारी नसल्या कारणाने तिला मुंब्रा पोलिस स्टेशनला जायला सांगितले असे सपना भगत म्हणाल्या. रात्रीच्या वेळी महिलांना मुंब्रा पोलिस चौकीला जाणे महिलेच्या सुरक्षेच्या दृष्टीने जोखमीचे आहे. असे सपना भगत यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची दखल घेत सपना भगत यांनी दिवा शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह निर्माण केली आहे. या पूर्वी ही सपना भगत यांनी महिला पोलिस अधिकाऱ्याची मागणी केली होती. त्यावेळी त्यांच्या मागणीची दखल घेत महिला पोलिस अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. पण काही तांत्रिक कारणास्तव त्यांना मुंब्रा पोलिस चौकीला पाठवण्यात आले. दिवा शहरातील महिलांवर होणाऱ्या अन्यायाच्या घटनांचा वाढता आलेख बघता दिवा पोलिस चौकीमध्ये महिला पोलिस अधिकाऱ्यांची तात्काळ पण कायमस्वरूपी नियुक्ती करावी. अशी मागणी भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सपना रोशन भगत व त्यांचे सहकारी मनीषा शालबिद्रे, साक्षी गावणकर, साधना सिंग, प्रियांका माडभगत, विठ्ठल गावडे यांनी केली आहे.

## मुंबई उपनगर पूर्व यांची मुलींमध्ये, तर सांगली यांची मुलांमध्ये विजयी सलामी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, पुणे :** मुंबई उपनगर पूर्व, सांगली यांनी १ल्या आदित्य चषक १८वर्षाखालील मुले व मुली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे मुली व मुलांमध्ये विजयी सलामी दिली. स्पर्धेचे उद्घाटन आदित्य ठाकरे वेळे अगोदर उपस्थित राहिल्याने सामने वेळे अगोदर सुरू झाले. पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज बंदिस्त क्रीडा संकुल येथील मॅट वर झालेल्या मुलींच्या पहिल्या सामन्यात मुंबई उपनगर पूर्वने मुंबई शहर पश्र्चिमचा ४५–३५ असा पाडाव केला. मध्यांतरा पर्यंत अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात २३–१७ अशी उपनगर कडे आघाडी होती. उत्तरार्धात मात्र उपनगराच्या सेरेना म्हसकर, प्रांजल जाधव, आस्था सिंग यांनी अधिक जोशपूर्ण खेळ करीत सामना आपल्या बाजूने झुकविला. मुंबई शहराच्या ऋतिका शिंदे, झारा शेख यांनी निकराची लढत दिली. पण त्यांना अपयश आले.

मुलांच्या सामन्यात सांगलीने अत्यंत चुरशीच्या सामन्यात पुणे ग्रामीणचा प्रतिकार ३६–२९ असा मोडून काढला. विश्रांतीला १७–१८ अशा पिछाडीवरून सांगलीने ही विजयाची किमया साधली. शेवटची ५ मिनिटे पुकारली तेव्हा २८–२८ अशी बरोबरी होती. पण सांगलीच्या यशराज आडकेने शेवटच्या २ मिनिटात शिलकी २ गडी टिपत पुण्यावर लोण देत आपला विजय निश्चित केला. यशला आदित्य जाधवची उत्तम साथ लाभली.सांगलीने ४ अव्वल पकडी देखील केल्या. पुण्याचा सुरज चांदणे एकाकी लढला. या स्पर्धेचे उदघाटन शिवसेनेचे युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. तद्प्रसंगी स्पर्धा आयोजक आमदार सचिन अहिर, राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## विज कर्मचाऱ्यांनी स्वत:चा जिव धोक्यात घालून विज पुरवठा केला सुरळीत



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुका व परिसरात दिनांक १३ जून २०२५ रोजी संध्याकाळी ४:३० ते ५:०० वाजे दरम्यान प्रचंड जोराचा पाऊस, वादळीवाऱ्यासह तसेच विजांचा कडकडाट सहित दमदार पाऊसाला सुरुवात झाली. दरम्यान पिंपळस, सुकेणे तसेच साखर कारखाना परिसरात दोन ते तीन ठिकाणी विज पडून विज कंपनीच्या ३३ के व्ही पिंपळस, जळगाव व नैताळे लाईनवर मोठा अडथडा निर्माण झाला. त्यामुळे पिंपळस, नैताळे, नांदुरमध्यमेश्वर तसेच जळगाव निघोज ह्या चारही उपकेंद्राचा वीजपुरवठा खंडित झाला होता. यामध्ये ३३ के व्ही लाईनवरील पिन इन्सुलेटर विविध ठिकाणी फुटले व विजवाहक तारा खाली आल्या. त्यामुळे पिंपळस, नांदुरमध्यमेश्वर तसेच निफाड ग्रामीण कक्षातील कर्मचाऱ्यांनी लागलीच विजपुरवठा सुरळीत करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली. सदर मोहिमेत पावसाचा व्यत्यय येत होता व आकाशात प्रचंड विजा चमकत होत्या. अश्या कठीण तसेच भयावह परिस्थितीत विज कर्मचाऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता ग्राहक सेवेला महत्व दिले व भर पावसात खंडित झालेला वीजपुरवठा अथक परिश्रम करून रात्री ठीक ०३:२० मी सुरळीत केला. सदर मोहिमेत निफाड उपविभागात नव्यानेच रुजू झालेले उपकार्यकारी अभियंता सुनील राऊत हे स्वतः कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी रात्री जागेवर उपस्थित होते. तसेच सदर मोहिमेत सहाय्यक अभियंते हेमंत शिनकर, जितेंद्र बोरसे, साकेत पाटील, स्वप्नील सवई व राहुल भगत हे हजर होते. जनमित्रांमध्ये श्री हांडगे, कुमावत, सांगळे, जगदाळे, प्रवीण पवार, विजय पवार, शिंदे, अकिब, दिघे, सुनील, साहिल व ईतर असे तीनही कक्षाचे जनमित्र व कर्मचारी उपस्थित होते. विद्युत कंत्राटदार मध्ये अरविंद मोरे, अभिजीत सानप तसेच संतोष भोसले यांची मदत झाली. वरील मोहीम ही नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदरजी लटपटे, नाशिक मंडळाचे अधिक्षक अभियंता राजेश थुल तसेच चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता केशव काळूमाळी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी संपन्न झाली.